पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/१७०/२०१५
दिनांक १३/ ०७/२०१५

प्रति,
मा.श्री./श्रीम. -------------------------------

सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- ४४

**विषय:- अ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १५ जुलै २०१५ रोजी आयोजित केलेबाबत.. .**

**महोदय/महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १५/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## अ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक ४

दिनांक:- १५/०७/२०१५ वेळ दुपारी १२.०० वाजता

……………………………………………………………………………………………………………

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुलै २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १५/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १०/०६/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे जून २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ३) कायम करणे.

विषय क्र. १ मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
दिनांक १५/०७/२०१५ रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे

विषय क्र. २ विद्युत विभागाकडील पत्र क्रमांक अक्षेका/ वि/१/५७४/२०१५ दि. ३/७/२०१५ चे विषयपत्रानुसार अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील सन २०१५-१६ चे महसुली अंदाजपत्रकामध्ये अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. १,००,०००/- तरतुद लेखा विभागाने मंजूर केलेली आहे. या विभागात तारतंत्री व विजतंत्री पदावर विद्यावेतनावर एकूण तीन कर्मचारी सध्या काम करीत आहेत व त्यांचे विद्यावेतनावर माहे मे २०१५ अखेर ८४,३७५/- (र.रु.चौ-याऐंशी हजार तीनशे पंचाहत्त्र) इतर झालेला खर्च वजा जाता र.रु.१५,६२५/- शिल्ल्क राहिलेली आहे. त्यामुळे यापुढील कालावधीमध्ये विद्यावेतनाचा संभाव्य् होणारा खर्च विचारता घेता तरतुद अपुरी पडणार आहे व त्यामुळे विद्यावेतनाची बिले अदा करणेकामी अडचणी निर्माण होणार आहेत.

सन २०१५-२०१६ चे अ अंदाजपत्रकात स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ३,०६,००,०००/- (अक्षरी रु.तीन कोटी सहा लाख फक्त्) इतकी तरतुद केलेली आहे. सदरचे लेखाशिर्षकावर माहे मे २०१५ अखेर ५७,५०,७७५/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. यामध्ये पुढील काळात माहे मार्च २०१६ अखेर कर्मचारी वेतन भत्ते, कर्मचारी यांची वेतनवाढ इ.पगार वाढीचा विचार करता यापूर्वी झालेल्या खर्चासह २,४०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर करणेत आलेली तरतुद ३,०६,००,०००/- मधून अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर रु. २,५०,०००/- तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ मा.जावेद शेख याचेकडील पत्र दिनांक २ जुलै २०१५ रोजीचा प्रस्ताव –
दत्तवाडी – विठ्ठलवाडी प्रभाग क्र.१५ मध्ये विठ्ठलवाडी दत्तवाडी मुख्य् रस्त्यालगत वायकर चाळी शेजारी महापालिकेचे अनेक वर्षापासून शौचालय आहे. परंतु पालिकेच्या वतीने वेळोवळी स्वच्छतेपासून डागडुजी पर्यंत लक्ष

दिले जात नसल्याने तेथे सतत घाणीचे साम्राज्य् असल्याने तेथील नागरिक त्रस्त् झाल्याने तेथे सुलभ शौचालय करण्यात यावे. सदर शौचालय सुलभमध्ये रुपांतरीत झाल्यास महिला-पुरुषांना स्वच्छ् शौचालयासह इतरांना लघुशंकेचीही सुविधा उपलब्ध् होईल.

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळावी.

विषय क्र.४ मा.जावेद शेख यांचेकडील दि. १३ जुलै २०१५ चा प्रस्ताव

दत्तवाडी विठ्ठलवाडी प्रभाग क्र. १५ मध्ये लालबहादुरशास्त्री नगर या परिसरातून वाहणा-या ओढयावर पूल असून सदर पुलास " लालबहादुर शास्त्री पूल हे नाव देण्यात यावे अशी मागणी येथील रहिवासी नागरिकांची असून त्याबाबत सहयांचे निवेदन माझ्या कार्यालयात दिले आहे. तरी उपरोक्त् भागातील पुलास " लाल बहादुर शास्त्री पूल नांव देणेत यावे.

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळावी.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे ४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/१७०/२०१५
दिनांक : १३/ ०७/२०१५